नियमित फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- कृष्णा
नि.क्र. १७.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - शुभम तुलाराम रंगारी,
वय २९ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – धामणगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. दिनांक ०३.०९.२०२४ रोजी पोलिसांनी माझ्या समक्ष काही कारवाई केली नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहीत नाही.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३.०९.२०२५ रोजी पोलीसांनी मला मौजा धामणगाव ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळावरुन एक ओबडधोबड दगड जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनाम्यावर माझी सही नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी सारंग

श्रीरामेला ओळखत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३.	नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
दिनांक - १०.०७.२०२५
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.